महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ 10 एप्रिल 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 282 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# सेंचुरी रेयॉन कामगार युनियनची बेकायदेशीर निवडणूक रद्द करा !




## सेंचुरी कामगारांचे कामगार मंत्र्यांना साकडे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** सेंचुरी रेयॉन कंपनी ची युनियनची बेकायदेशीर निवडणूक रद्द करा.कामगारांचे कामगार मंत्र्यांना साकडे.शहाड कल्याण तालुक्यातील सर्वाधिक कामगार संख्या असलेली व नावाजलेली शहाड येथील सेंचुरी कपंनी मधील युनियन वाद आता चांगलाच तापला आहे. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे उल्लंघणं करत लोकशाहीची पायमळणी करत, कामगारांच्या हक्कावर गदा आणत या कंपनी च्या कामगार युनियन ची निवडणूक मार्च 2025 मध्ये घेण्यात आली. ही निवडणूक घेताना बहुसंख्य कामगारांना विश्वासात न घेता गुपचूप निवडणूक घेऊन बहुसंख्य युनियन सभासद कामगारांना अंधारात ठेऊन घाई गडबडीत राजकीय दबाव तंत्र वापरून ही निवडणूक घेण्यात आली आहे. असा आरोप कामगारांनी कामगार मंत्री आकाश फुंडकर यांना दिलेल्या तक्रारीच्या निवेदनात केला आहे.

सेंचुरी रेयॉन मध्ये इंटक प्रणित कामगार युनियन आहे. या युनियनवर आपलेच वर्चस्व असावे यातुन राजकीय नेत्याने युनियन ताब्यात घेण्यासाठी हा निवडणूक फार्स केला असल्याचा आरोप कामगारांचा आहे. याबाबत कामगारांनी कामगार आयुक्त, कामगार मंत्री, व कामगार विभाग सचिव यांच्या कडे तक्रारी केल्या आहेत.




## उल्हासनदी प्रदूषणात जीन्स कारखान्यांची भर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण, ता. ८ :** उल्हासनगरच्या वालधुनी किनाऱ्यावरून हद्दपार झालेले जीन्स धुलाई कारखाने आता अंबरनाथ आणि कल्याण तालुक्यांमधील जलस्रोत प्रदूषित करत असल्याचे आढळून आले आहे. या जलस्रोतांचे पाणी पुढे उल्हास, वालधुनी नद्यांनाच मिळते. पर्यायाने नदी प्रदूषणात जीन्स धुलाई कारखान्यांचे रासायनिक पाणीही कारणीभूत ठरत आहे. एकीकडे राज्य सरकार उल्हास, वालधुनी नद्यांच्या प्रदूषणमुक्तिचा आराखडा तयार करण्यात व्यस्त आहे. तर दुसरीकडे या नद्या प्रदूषित करण्याचे गोरखधंदे राजरोस सुरू आहेत. उल्हास नदीतील जलपर्णी वाढीमुळे चर्चेत आलेल्या प्रदूषणाच्या मुद्द्यामागे आता अनेक कारणे असल्याचे दिसून येत आहे. औद्योगिक क्षेत्राकडून येणारे रासायनिक पाणी, घरगुती सांडपाणी याबरोबरच आता अंबरनाथ व कल्याण तालुक्यांच्या ग्रामीण भागात जीन्स धुलाई कारखानेही नदी, नाल्यांमध्ये प्रत्यक्ष प्रदूषण करताना आढळून आले आहेत. उल्हासनगर शहरातून वालधुनी नदीच्या प्रदूषणाच्या मुद्द्यावर जीन्स धुलाई कारखाने हद्दपार करण्यात आले. लहान सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प राबवल्यानंतरच कारखाने सुरू केले जातील, अशी भूमिका सर्वोच्च न्यायालयाने घेतली होती. त्यामुळे जीन्स धुलाई कारखान्यांनी उल्हासनगर सोडले आणि ग्रामीण भाग गाठला आहे.

अंबरनाथ तालुक्यातील वांगणी, नेवाळी, द्वारली, खोणी, अंबरनाथ शिवमदिरजवळील परिसरात सध्या या जीन्स धुलाई कारखान्यांनी आपले बस्तान बसवले आहे. असेच काही कारखाने कल्याण तालुक्याच्या ग्रामीण भागात आहेत. यातील वांगणीमध्ये चक्क काराव गावाच्या ग्रामपंचायतीच्या इमारतीमागेच चार ते पाच जीन्स धुलाई कारखाने आहेत. या कारखान्यांमधून निघणारे निळे, काळे रासायनिक पाणी थेट जवळच्या बंधाऱ्यात सोडले जाते. या बंधाऱ्यातले पाणी पुढे उल्हास नदीत जाते. हेच पाणी पुढे वाहत बॅरेज प्रकल्पात जाते आणि तिथून बदलापूरकरांची तहान भागवण्यासाठी वापरले जात असल्याचे दिसून आले. नेवाळी, द्वारली, खोणी येथे देखील असेच कारखाने आहेत. त्यांच्यामार्फत निघणारे पाणी हे नजिकच्या नाल्यात जाते. या नाल्यातून पाणी उल्हास नदीत येते, असे प्रत्यक्षदर्शींनी सागितले. बऱ्याचदा असे पाणी एका मोठ्या खड्ड्यातही सोडले जाते, ज्यामुळे भूजल स्तर प्रदूषित होतो, असे जाणकारांचे मत आहे.

## सात वर्षे वापराविना पडलेल्या ३० घंटागाड्या भंगारात



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** बदलापूर नगरपालिकेने गेल्या सात वर्षांपासून निष्क्रिय आणि वापराविना पडून असलेल्या ३० घंटागाड्यांना अखेर भंगारात विक्रीसाठी काढले आहे. विशेष म्हणजे, कोट्यवधी रुपयांचा खर्च करून खरेदी केलेल्या या घंटागाड्यांसाठी अवघ्या १६ लाख रुपयांची निविदा पालिकेने जाहीर केली आहे. त्यामुळे करदात्यांच्या पैशांचा अपव्यय झाल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

साल २०१७ दरम्यान बदलापूर नगरपालिकेने शहरातील कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी आधुनिक घंटागाड्यांची खरेदी केली होती. मात्र, या वाहनांचा वापर फारकत एक वर्षच झाला. त्यानंतर काही कारणास्तव या गाड्यांना अडगळीत टाकण्यात आले. गेली सात वर्षं या गाड्या मलनिसारण प्रकल्पात उघड्यावर धूळ खात पडून होत्या. त्यांच्या देखभालीकडे पूर्णतः दुर्लक्ष करण्यात आलं.

परिणामी, या वाहनांची स्थिती इतकी खराब झाली की, परिवहन विभागाने देखील त्या वापरण्यायोग्य नसल्याचा स्पष्ट अभिप्राय दिला. त्यानंतर पालिकेने या गाड्या भंगारात विक्रीसाठी काढण्याचा निर्णय घेतला. यासाठी अवघ्या १६ लाख रुपयांमध्ये निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. वास्तविक पाहता, त्या गाड्यांच्या खरेदीवर कोट्यवधी रुपयांचा खर्च झाला होता. या प्रकरणामुळे पालिका प्रशासनातील निर्णयक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, नागरिकांनी यावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे सार्वजनिक पैशांचा असा अपव्यय झाल्याची टीका होत आहे. अनेक नागरिकांनी सोशल मीडियावरून याबाबत संताप व्यक्त केला असून, दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या घटनेमुळे पालिकेच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न निर्माण झाले असून, भविष्यात असे प्रकार टाळण्यासाठी कठोर निर्णय घेण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

> **बदलापूर पालिकेचा प्रताप**
>
> **कोट्यवधींचा खर्च करून खरेदी केलेल्या घंटागाड्यांसाठी अवघ्या १६ लाखांची निविदा**
>
> परिवहन विभागाने सदर घटागाड्या वापरण्यायोग्य नसल्याचा स्पष्ट अभिप्राय दिल्यानंतर पालिकेने या गाड्या भंगारात विक्रीसाठी काढण्याचा निर्णय घेतला. यासाठी अवघ्या १६ लाख रुपयांमध्ये निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. वास्तविक पाहता, त्या गाड्यांच्या खरेदीवर कोट्यवधी रुपयांचा खर्च झाला होता. या प्रकरणामुळे पालिका प्रशासनातील निर्णयक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले

## अंबरनाथ शहरात अनधिकृत बांधकामांचा सुळसुळाट

### अनधिकृत गाळ्यांवरील कारवाईकडे दुर्लक्ष

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ, ता. ८ (वार्ताहर) :** विकासाचा अंबरनाथ पॅटर्न असा गाजावाजा करणाऱ्या शहरात अनधिकृत बांधकामांचा सुळसुळाट सुरू आहे. याकडे पालिकेचे कोणतेही अधिकारी लक्ष देत नाहीत. शहराच्या प्रवेशद्वारावरच पत्र्याचे अनधिकृत गाळे उभारल्याची बाब माध्यमांनी दोन महिन्यांपूर्वी समोर आणली होती. परंतु, अजूनही या गाळ्यांवर कारवाई झालेली नाही. त्यामुळे दुसऱ्या खात्याचा अतिरिक्त भार घेऊन बसलेले अतिक्रमण विभागाचे अधिकारी स्वतःच्या मूळ खात्याचे काम मात्र करतच नसल्याचे पाहायला मिळत आहे.

लोकनगरी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना मोठ्या प्रमाणात पत्र्याचे अनधिकृत गाळे बांधण्यात आले आहेत. आणखी काही गाळे बांधण्यासाठी मातीचा भरावही करून ठेवण्यात आला आहे. या गाळ्यांना जुन्या तारखांच्या नोटिसा देण्यापलिकडे अतिक्रमण विभागाने कोणतीही कारवाई केलेली नाही. त्यामुळे अधिकाऱ्यांचे हात नेमके कोणत्या दगडाखाली आहेत ? याचा मुख्याधिकाऱ्यांनी शोध घेण्याची आवश्यकता आहे. शहरातील अतिक्रमणांचा विषय निघाला, की पालिकेचा अतिक्रमण विभाग भाजीवाले, फळवाले, फेरीवाले किंवा दुकानाबाहेर ठेवलेल्या जाळ्यांवर कारवाई करून दिखावा करतो. पण, मुळात शहराच्या विद्रूपीकरणाला कारणीभूत ठरणाऱ्या अनधिकृत गाळ्यांवर कारवाई करायला कर्मचारी धजावत नाहीत. उलट त्यांना तत्परतेने कर पावती देऊन वीजजोडणी मिळवून देण्यास मदत केली जाते. त्यामुळे अशा अधिकारी, कर्मचाऱ्यांवर नवे मुख्याधिकारी कारवाई करतात का? हे पाहावे लागणार आहे.



अनधिकृत गाळेधारकांना पालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून नोटीस पाठवण्यात आल्या आहेत. गाळेधारकांना मुदत देण्यात आली आहे. त्यानुसार दिलेल्या मुदतीमध्ये हे गाळे हटले गेले नाही, तर निश्चितच त्यांच्यावर तोडक कारवाई पालिकेमार्फत करण्यात येईल.
- किमया पवार, जनसंपर्क अधिकारी

## 'एफडीए'कडून ६२ लाखांचा औषधसाठा जप्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई / वृत्तसेवा ता. ९ :** औषध विक्रीसाठी आवश्यक परवाना न घेता औषध साठवणूक करणाऱ्या घाटकोपर येथील अर्बन केअर लाइफ एलएलपी या औषध विक्रेत्यावर अन्न व औषध प्रशासनाने कारवाई केली. या छाप्यात तब्बल ६१ लाख ९५ हजार ८७१ रुपयांचा बेकायदा औषधसाठा जप्त करण्यात आला. औषध व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व १९४५ नुसार ही कारवाई मंगळवारी (ता. १) करण्यात आली.

मुंबईच्या गुप्तचर विभागाला मिळालेल्या माहितीच्या आधारे हा छापा टाकण्यात आला. या विक्रेत्याने कोणताही वैध परवाना न घेताच औषधांचा साठा केला होता. याची खातरजमा झाल्यानंतर औषध निरीक्षक प्रेमनाथ साखरे यांनी औषधांचे नमुने तपासणीसाठी घेत साठा जप्त केला. ही कारवाई अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त राजेश नार्वेकर, सहआयुक्त दक्षता डॉ. राहुल खाडे, तसेच मुंबई विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. संबंधित विक्रेत्यावर पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार आहे, तसेच अवैध औषध विक्री करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा अन्न व औषध प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

## आयुक्त अभिनव गोयल यांनी स्वीकारला केडीएमसीचा पदभार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महापालिका आयुक्त अभिनव गोयल नागरीकांना सुलभ व जलद गतीने पारदर्शक सेवा देण्याचा आपला मानस राहिल, असे प्रतिपादन आज नवनियुक्त महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी पालिका प्रशासनाची सुत्रे स्विकारल्यानंतर पत्रकारांशी झालेल्या वार्तालापात केले.

महापालिकेतील प्रकल्पांना, विविध कामांना कशा प्रकारे गती देता येईल, याबाबत प्रयत्न करु. तसेच artificial intelligence च्या मदतीने नागरीकांचा सहभाग कसा वाढेल, प्रशासन जास्तीत जास्त लोकाभिमुख होण्याच्या दृष्टीकोनातून आपण प्रयत्न करु अशी माहिती त्यांनी दिली. शहरं ही भारताचे भविष्य आहेत, त्यामुळे आपल्या शहरांच्या विकासासाठी पुढील 20 वर्षांचे नियोजन करण्याच्या दृष्टीने तसेच आपल्या परिक्षेत्राचा अभ्यास करुन, त्यावर उपाय-योजना केल्या जातील, अशी माहिती देखील त्यांनी दिली.महापालिकेच्या पाणी पुरवठा योजना, आरोग्य व्यवस्था, शिक्षण यावर प्रामुख्याने लक्ष केंद्रीत केले जाणार असून, मा.मुख्यमंत्री महोदयांच्या 100 दिवसीय कृती आराखड्याच्या अनुषंगाने नागरीक हा केंद्र बिंदु ठेवून, त्यांच्या समस्या व तक्रारींचे निराकरण करण्यासाठी प्रयत्न करु, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.




## भातसा नदीत बुडून एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** शहापूर भातसा नदीत एकाच कुटुंबातील ३ जण बुडाले@शहापूर/ राजेश जागरे -शहापुर जवळील वाफे भागात बत्तीस एकर भागतील भातसा नदीवर एकाच कुटुंबातील तिघे जवळ असणाऱ्या भातसा नदीवर कपडे धुण्यासाठी व अंघोळीसाठी गेले होते त्यावेळेस पाय घसरून पाण्यात पडलेल्या महिलांना वाचवण्यासाठी 15 वर्षीय मुलाने प्रयत्न केले असता तो ही भातसा नदीच्या पाण्यात बुडाल्याने तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना दुपारच्या वेळेस घडली.याबाबत पोलिसांकडून माहिती मिळताच शहापुरच्या जिवरक्षक टीमच्या सदस्यांनी तात्काळ भातसा नदीकाठी पोहचवून नदीतून तीनही मृतदेह बाहेर काढले. लक्ष्मी दत्तात्रय पाटील (वय 50), धीरज दत्तात्रय पाटील (वय 16) दोघे ही रा. गंगारोड,आणि वनिता सुदर्शन शेळके (वय 33 ) रा.वाफे, शहापूरअसे एकाच कुटुंबातील तिघांचा पाण्यात बुडून मृत्यू झालेल्याची नावे आहेत.

शहापूर येथील वाफे भागात येणाऱ्या बत्तीस एकर भागतील भातसा नदीवर कपडे धुण्यासाठी व अंघोळीसाठी गेले होते त्यावेळे पाय घसरून पाण्यात पडलेल्या महिलांना वाचवण्यासाठी धीरज याने प्रयत्न केलेत परंतु तो ही भातसा नदीच्या पाण्यात बुडाल्याने तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला.या तिघांचे मृत देह जीव रक्षक दल शहापूर यांनी पाण्यातून शोधून काढले असून मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठीशहापूर उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. आई, मुलगा व भाची असे एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त होत असून पुढील तपास शहापूर पोलीस करीत आहेत.



## गीतासार



### अध्याय ७
### ज्ञानविज्ञानयोगः

पुण्यो गन्धः पृथिव्यां च तेचश्चास्मि विभावसौ । जीवनं सर्वभूतेषु तपश्चास्मि तपस्विषु ॥ ७-९ ॥

मी पृथ्वीतील पवित्र गंध आणि अग्नीतील तेज आहे. तसेच सर्व सजीवांचे जीवन आहे आणि तपस्व्यांतील तप मी आहे. ॥ ७-९ ॥

श्लोक १०बीजं मां सर्वभूतानां विद्धि पार्थ सनातनम् । बुद्धिर्बुद्धिमतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् ॥ ७-१० ॥

हे पार्था (अर्थात पृथापुत्र अर्जुना), तू संपूर्ण सजीवांचे सनातन कारण मलाच समज. मी बुद्धिमानांची बुद्धी आणि तेजस्व्यांचे तेज आहे. ॥ ७-१० ॥

बलं बलवतां चाहं कामरागविवर्जितम् । धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ ॥ ७-११ ॥


हे भरतश्रेष्ठा (अर्जुना), मी बलवानांचे आसक्तिरहित व कामनारहित बल म्हणजे सामर्थ्य आहे आणि सर्व सजीवांतील धर्माला अनुकूल अर्थात शास्त्राला अनुकूल असा काम आहे. ॥ ७-११ ॥

ये चैव सात्त्विका भावा राजसास्तामसाश्च ये । मत्त एवेति तान्विद्धि न त्वहं तेषु ते मयि ॥ ७-१२ ॥

आणखीही जे सत्त्वगुणापासून, रजोगुणापासून आणि तमोगुणापासून उत्पन्न होणारे भाव व पदार्थ आहेत, ते सर्व माझ्यापासूनच उत्पन्न होणारे आहेत, असे तू समज. परंतु वास्तविक पाहाता त्यांच्यात मी आणि माझ्यात ते नाहीत. ॥ ७-१२ ॥

## रेसिपी

### मेक्सिकन फ्राइड राईस



**साहित्य**

तांदूळ - 2 कप,लाल, पिवळी, हिरवी सिमला मिरची - प्रत्येकी अर्धी,स्वीट कॉर्न - 1 कप,उकडलेले राजमा - 1 कप,चिरलेला कांदा - 2,टोमॅटो प्युरी - अर्धा कप,ओरीगॅनो, लसणाच्या पाकळया - 3 ते 4,हिरवी मिरची - २ कोथिंबीर,कांद्याची पात,मीठ,तेल,

**कृती**

सर्वप्रथम अर्धा तास तांदूळ पाण्यात भिजत ठेवा.

एका मोठ्या पॅनमध्ये तेल गरम करण्यास ठेवावे. तेल गरम झाले की, त्यात लसणाच्या पाकळया आणि हिरव्या मिरच्या घालाव्यात.

लसूण परतल्यावर त्यात कांदा घाला आणि परतवून घ्याव्यात.

कांदा गुलाबीसर झाल्यावर त्यात भिजवलेले तांदूळ घाला आणि गॅसची आच वाढवा.

तांदूळ 3 ते 4 मिनिटे परतवून घ्या.

यानंतर त्यात तिन्ही प्रकारच्या सिमला मिरच्या, टोमॅटो प्यूरी घालावी.

आता भातात ओरीगॅनो, स्वीट कॉर्न, उकडलेले राजमा आणि गरजेनुसार पाणी घाला.

पॅनवर झाकण ठेवा आणि भात शिजवून घ्यावा.

भात शिजल्यावर गॅस बंद करा.

यानंतर भातावर कांद्याची पात आणि कोथिंबीर चिरून घाला.

अशा पद्धतीने तुमचा मेक्सिकन फ्राइड राईस तयार झाला आहे.

# दान



## दानाचे महत्त्व

आजच्या या धकाधकीच जीवनात माणूस माणसाला ओळखेनासा झाला आहे त्यामुळे निसर्गही आपली मर्यादा ओलांडताना दिसत आहे. माणूस बाहेर पडला की घरात येईपर्यंत त्याची काळजी लागून राहते.वर्तमानपत्राचे पान उघडल्यावर एखाद दुसरा अपघाताची नोंद नाही असा दिवस उजाडत नाही. माझ्या मित्राच्या मुलाचा अपघाती मृत्यू झाला होता. समजावण्यासाठी त्याच्या खोलीवर गेलो घरात स्मशान शांतता होती कोणीही बोलत नव्हते सर्वजण गप्प होते थोडा वेळ मीही गप्प राहिलो नंतर धीर करून सहज विचारलं "काय हो काय झाले"? माझ्या प्रश्नानंतर मुलाच्या चुलत्याने सांगितले माझा मुलगा व त्याचा मित्र दोघे मोटर सायकलवर बसून कामानिमित्त जात होते तरुण रक्त मोटरसायकल भरधाव होती शिवाय डोक्यात हेल्मेट नव्हती गाडी एका गडरवर ठेपालली आमचा मुलगा उडून पुढील एका सिमेंटच्या गडगरवर आढळला. डोक्याला जबर मार लागून खाली पडला गाडी चालवणाऱ्या त्याच्या मित्राला थोडा जुजबी मार लागला अशा वेळी रस्त्यावरून जाणाऱ्या वाटसरुनी त्यांना मदत केली जवळच्या एका मोठ्या हॉस्पिटलमध्ये नेले तेथे गेल्यावर आमच्या मुलाला मृत घोषित केले फोन मिळाल्यावर आम्ही सांगितलेल्या हॉस्पिटलमध्ये गेलो ही आपत्ती पाहून आमच्यावर दुःखाचा डोंगर पडला. तशात ही एक डॉक्टर आमचे जवळ आले आम्हाला शांत करण्याचा प्रयत्न केला व म्हणाले तुम्ही मुलाचे बाप व चुलते हात आपल्या मुलाच्या फक्त डोक्यालाच मार लागला आहे इतर सर्व अवयव सुस्थितीत आहेत आपण अवयव दान करून इच्छित असल्यास आपला मुलगा ये लोक सोडून गेला आहे अवयव दान केल्यास अवयव रुपाने तरी जिवंत राहील यासाठी आपले सहकार्य हवे आहे मुलाचे वडील व चुलते यांना प्रश्न पडला आता काय करावे त्यांनी दोघांनी मिळून ठरवले की आपला मुलगा जगात नाही पण असे अनेक माणसे आहेत ते अवयवासाठी धडपडत आहेत त्यांना आपल्या मुलाचे अवयव देऊन त्यांच्या आयुष्यात आनंद येईल हे मोठे पुण्य कर्म करेल त्यांनी मुलाचे सर्व अवयव जे माणसाचे शरीरात ट्रान्सफर होऊ शकतील असे सर्व अवयव दान करण्यास होकार दिला कोणताही मोबदला घेतला नाही मग काय, डॉक्टरांपुढे भली मोठी यादी तयारच होती सर्व अवयव काढून दुसऱ्या व्यक्तीच्या शरीरात ऑपरेशन करून बसवले या दोन भावांचे मन किती मोठे होते ज्यामुळे त्यांना हे अवयव मिळाले त्यांच्या आयुष्यात आनंद निर्माण झाला त्यांच्या आनंदात दोन भावांनी धन्यता मानली

दानासाठी एक संस्कृत सुभाषित आहे दातव्या

भीतीयद् दानं
दियते नुपकारणे
देशे कालेचपात्रेचे तद्
दान सात्विक स्मृतम

याचा अर्थ योग्य देश काल आणि पात्र व्यक्तीला विना मोबदला केलेले दान सात्विक मानले जाते म्हणूनच म्हणतात "दान हे सत्पात्री असावे" दानशूरामध्ये कर्णाचे नाव प्रथम घेतले जाते परंतु याहीपेक्षा मोठा दानशुर राजा हरिश्चंद्र होता. त्यांनी आपले संपूर्ण राज्य म्हणजे नवखंड पृथ्वी विश्वमित्राला स्वप्नात दान केले. दहावे खंड काशी तेथे जाऊन डोंबाचे काम केले. आज अशी व्यक्ती शोधूनही सापडणार नाही. कर्णापेक्षा राजा हरिश्चंद्र उजवा होता.

दान देण्याचे अनेक प्रकार आहेत ज्याला जे शक्य होईल ते दान करावे दान म्हटले की रक्तदान ,अवयवदान अन्नदान, श्रमदान, कन्यादान, ज्ञानदान, मतदान, द्रव्यदान,जलदान. एखादी व्यक्ती स्वर्गवासी झाल्यावर त्यांचे तेरावे घालतात त्यामध्ये गायदान कुंभदान पिंडदान करतात पूर्वी प्रत्यक्ष गायदान म्हणून दिली जायची आता काल्पनिक म्हणजे काय आणून तिची पूजा करतात. कुंभदानात मडक्या ऐवजी तांब्या दान करतात म्हणजे पिंड दानात पूर्वीच्या संकल्पनाना जणू आपण नवीन स्वरूपच दिले एवढेच.

पूर्वी सूर्यास किंवा चंद्रास ग्रहण लागले म्हणजे लोक समजायचे की सूर्य चंद्राला राहू आणि केतूनी गिळाले अशी समजत होती. त्या समजूतीचा फायदा काही लोक घरोघर जाऊन "दे दान सुटे गि-हाण" अशी आरोळी ठोकत. दान मागायचे त्यावेळी लोक त्याला काहीना काही दान करायचे आता मात्र ग्रहणाची माहिती सर्व मुखी झाली आहे त्यामुळे तो प्रकार बंद झाला. आपल्या महाराष्ट्रातील महान संत विनोबाजी भावे यांनी भूदासाठी सर्व जमीनदार व्यक्तींना आवाहन केले यामुळे अनेक जमीनदार व्यक्तींनी जमीन दान केल्या होत्या आजही भूदान केलेल्या जमिनी भूदानाच्या नावाने सातबारा आहे.

पूर्वी राजे राजवडे दुसऱ्याच्या राज्यावर स्वाऱ्या करायचे व पराजित राजावर नामुष्की यायची तो राजा विजय राजाला शरण जायचा अशा शरणागत राजाला विजयी अभय द्यायचा त्याचे राज्य व मुलुख परत करून अभय द्यायचा यालाच अभयदान म्हणतात अशी उदाहरणे इतिहासात पाहायला मिळतील.

एखादा प्राणी अथवा पक्षी हा आजारी अथवा दुखापदग्रस्त असला व तो मानवाच्या संपर्कात आला तर त्याचे वर उपचार करून त्याला बरे करणं त्याला स्वच्छंद निसर्गात पाठवतात याला जीवनदान म्हणतात ;पण प्राणिमात्रावर दया करणारा हाच मानव आपल्या आप्तेष्ट वा नातलग आजारी वा संकटात असल्यास मदत करील काय? याचे उत्तर शोधावे लागेल!

सर्व दानात श्रेष्ठ दान म्हणजे ज्ञानदान ज्ञानदान केवळ गुरु अथवा शिक्षकच करत नाहीत कोणतीही व्यक्ती आपले असलेले व्यवहार ज्ञान दुसऱ्याला देतो व त्याचा फायदा त्याला आयुष्यभर होतो उदाहरणार्थ मातेने मुलावर केलेले संस्कार आयुष्यभर पुरतात ज्ञान कधीही पुसले अथवा विसरले जात नाही तर एका पिढीकडून दुसऱ्या पिढीत संक्रमित होते इतिहासकालीन ज्ञान मानवाला उपयुक्त आहे मानवाला चांगल्या मार्गावर नेणारे आहे वरील दानाच्या प्रकारामुळे आपल्याला कोणत्या ना कोणत्या दालनाच्या प्रकारात खारीचा वाटा घेतल्यावर समजहित जपले जाईल व स्वतःलाही दानाचे पुण्य मिळेल .

**गिरीधर पिंगळे गुरुजी**
**गोरठण बुद्रुक वावोशी फाटा**

## 'वीड टू वेल्थ' प्रकल्पामार्फत बचत गटांतील महिला तयार करणार भेटवस्तू

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : उल्हास नदीतील जलपर्णींचा वापर करून महिला बचत गटांमार्फत भेटवस्तू तयार करण्याच्या उद्देशाने मंगळवारी जलपर्णी व्यवस्थापन करण्याच्या उद्देशाने जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, प्रकल्प संचालक, छायादेवी शिसोदे यांच्या प्रमुख उपस्थितीत तर अध्यक्ष अजय बहुद्देशीय संस्थेच्या व्यवस्थापक स्वाती धोटकर यांचा मार्गदर्शशाखाली म्हारळ, काबां, वरप येथे जलपर्णींची पाहणी करण्यात आली. तसेच म्हारळ ग्रामपंचायतीमध्ये उमेद अंतर्गत असलेल्या महिलांशी सविस्तर चर्चा करण्यात आली.



मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या विशेष मार्गदर्शनाने उल्हास नदीतील जलपर्णींपासून विविध भेटवस्तू महिला बचत गटांमार्फत तयार करण्याचे नियोजन सुरू आहे. बचत गटांतील महिलांना आर्थिक स्वावलंबनासाठी तसेच विविध कलागुणांना वाव देण्यासाठी 'वीड टू वेल्थ' प्रकल्प महत्त्वाचा आहे. बचत गटातील महिलांसोबत जलपर्णी पासून उद्योग व व्यवसाय या विषयी चर्चा करण्यात आली तर जलपर्णी पासून तयार करण्यात आलेल्या वास्तू महिलांना दाखविण्यात आले. महिलांना रोजगार निर्मिती बाबत मार्गदर्शन करण्यात आले. या भेटीदरम्यान अंबरनाथ तालुक्यातील ढोके दापिवली, साई या ग्रामपंचायतींच्या नदीवर देखील प्रत्यक्ष भेट देऊन माहिती घेण्यात आली.

या क्षेत्र भेटीदरम्यान गट विकास अधिकारी, प. स. कल्याण संजय भोये, जिल्हा अभियान व्यवस्थापक सारिका भोसले, कृषी अधिकारी, तालुका अभियान व्यवस्थापक, तालुका व्यवस्थापक एसआयआयबी सीबी, प्रभाग समन्वयक सर्व कल्याण, प्रभाग समन्वयक अंबरनाथ, ग्रामविकास अधिकारी, अंबरनाथ तालुक्यातील विस्तार अधिकारी (ग्रा. पं) आदी उपस्थित होते.

### कल्याण-डोंबिवली महानगरपालिका
## अधिकाऱ्यावर एम आर टी पी अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) चे विधानसभा सह संघटक रूपेश भोईर यांनी परिमंडळ तीन चे पोलीस उपायुक्त यांना पत्र पाठवून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अधिका-यावर एम आर टी पी अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

रूपेश भोईर यांनी पोलीस उपायुक्त यांना दिलेल्या पत्रात असं म्हटले आहे की महानगरपालिका मुख्यालयाच्या निकास द्वारा वर सार्वजनिक शौचालय बांधण्याचा कट रचला गेला . सदरचा सार्वजनिक शौचालय महानगरपालिका मुख्यालयाच्या मंजूर नकाशात अनधिकृत रीत्या फेरफार करून बाँधण्यात येत होता. ह्या बाबती आम्ही महानगरपालिका प्रशासक आणि आयुक्त यांना 18/03/2025 रोजी एक पत्र देऊन संबंधित अधिका-यावर एम आर टी पी अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती . पण आमच्या पत्राची योग्य ती दखल घेतली गेली नाही. रूपेश भोईर यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगीतले की जेव्हां एखादा सामान्य नागरिक कुठला ही अनधिकृत बांधकाम करतो त्यावेळी महानगरपालिके तर्फे त्याच्यावर एम आर टी पी अंतर्गत गुन्हा दाखल केला जातो आता तर सरळ महानगरपालिका तर्फेच अनधिकृत बांधकाम झाला आहे. म्हणून आता कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या दोषी अधिका-यावर गुन्हा दाखल झालाच पाहिजे.

## रायगड : सरपंच पदाची आरक्षण अधिसूचना जारी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : यापूर्वी प्रसिध्द केलेल्या सर्व अधिसूचना अधिक्रमीत करुन पाच वर्षांच्या कालावधीसाठी रायगड जिल्ह्यातील ग्रामपंचायतींसाठी सन 2025-2030 साठी सरपंच पदांचे आरक्षण निश्चित करुन अधिसूचना राजपत्राद्वारे प्रसिध्द झाली आहे. त्यानुसार तालुका निहाय सरपंच पदांचे आरक्षण निश्चित करुन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सन 2025 ते 2030 या कालावधीसाठी तालुकानिहाय सरपंच पदाची आरक्षण अधिसूचना जारी केली आहे.

अलिबाग तालुका- ग्रामपंचायत संख्या 62, अनुसूचित जाती आरक्षीत जागा खुला 0,महिला 1, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला 5,महिला 6, नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला 9, महिला 8, सर्वसाधारण जागा-खुला 17, महिला 16.

मुरुड तालुका- ग्रामपंचायत संख्या 24, अनुसूचित जाती आरक्षीत जागा खुला 0,महिला 1, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला 3,महिला 2, नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला 3, महिला 4, सर्वसाधारण जागा-खुला 6, महिला 5.

पेण तालुका- ग्रामपंचायत संख्या 64, अनुसूचित जाती आरक्षीत जागा खुला 1,महिला 0, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला 7,महिला 7, नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला 8, महिला 9, सर्वसाधारण जागा-खुला 16, महिला 16.

पनवेल तालुका- ग्रामपंचायत संख्या 71, अनुसूचित जाती आरक्षीत जागा खुला 2,महिला 1, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला 5,महिला 6, नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला 9, महिला 10, सर्वसाधारण जागा-खुला 20, महिला 18.

उरण तालुका- ग्रामपंचायत संख्या 35, अनुसूचित जाती आरक्षीत जागा खुला 1,महिला 0, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला 2,महिला 1, नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला 4, महिला 5, सर्वसाधारण जागा-खुला 11, महिला 11.

कर्जत तालुका- ग्रामपंचायत संख्या 55, अनुसूचित जाती आरक्षीत जागा खुला 1,महिला 1, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला 8,महिला 8, नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला 8, महिला 7, सर्वसाधारण जागा-खुला 10, महिला 12.

खालापूर तालुका- ग्रामपंचायत संख्या 45, अनुसूचित जाती आरक्षीत जागा खुला 1,महिला 1, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला 5,महिला 5, नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला 6, महिला 6, सर्वसाधारण जागा-खुला 11, महिला 10.

रोहा तालुका- ग्रामपंचायत संख्या 64, अनुसूचित जाती आरक्षीत जागा खुला 1,महिला 2, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला 5,महिला 5, नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला 9, महिला 8, सर्वसाधारण जागा-खुला 17, महिला 17.

सुधागड तालुका- ग्रामपंचायत संख्या 33, अनुसूचित जाती आरक्षीत जागा खुला 0,महिला 1, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला 5,महिला 6, नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला 4, महिला 5, सर्वसाधारण जागा-खुला 7, महिला 5.

माणगाव तालुका- ग्रामपंचायत संख्या 74, अनुसूचित जाती आरक्षीत जागा खुला 2,महिला 2, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला 3,महिला 4, नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला 10, महिला 10, सर्वसाधारण जागा-खुला 22, महिला 21.

तळा तालुका- ग्रामपंचायत संख्या 25, अनुसूचित जाती आरक्षीत जागा खुला 1,महिला 1, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला 2,महिला 2, नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला 4, महिला 3, सर्वसाधारण जागा-खुला 5, महिला 7.

महाड तालुका- ग्रामपंचायत संख्या 134, अनुसूचित जाती आरक्षीत जागा खुला 3,महिला 3, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला 5,महिला 4, नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला 18, महिला 18, सर्वसाधारण जागा-खुला 41, महिला 42.

पोलादपूर तालुका- ग्रामपंचायत संख्या 42, अनुसूचित जाती आरक्षीत जागा खुला 1,महिला 2, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला 2, महिला 1, नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला 5, महिला 6, सर्वसाधारण जागा-खुला 13, महिला 12.

श्रीवर्धन तालुका- ग्रामपंचायत संख्या 43, अनुसूचित जाती आरक्षीत जागा खुला 1,महिला 0, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला 3, महिला 3, नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला 6, महिला 6, सर्वसाधारण जागा-खुला 11, महिला 13.

म्हसळा तालुका- ग्रामपंचायत संख्या 31, अनुसूचित जाती आरक्षीत जागा खुला 1,महिला 1, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला 2,महिला 2, नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला 6, महिला 5, सर्वसाधारण जागा-खुला 10, महिला 12.

अशा एकूण जिल्ह्यातील ग्रामपंचायत संख्या 810, अनुसूचित जाती आरक्षीत जागा खुला 16,महिला 17, अनुसूचित जमाती आरक्षित जागा खुला 62,महिला 62, नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षित जागा खुला 109, महिला 110, सर्वसाधारण जागा-खुला 217, महिला 217.

## आता सर्व शाळांमध्ये राष्ट्रगीतासोबतच राज्यगीतही अनिवार्य

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्यातील सर्व शाळांमध्ये आता प्रार्थना, परिपाठ, राष्ट्रगीत आणि प्रतिज्ञेसोबत 'जय जय महाराष्ट्र माझा' हे राज्य गीत अनिवार्यपणे वाजवले जाणार आहे. शालेय शिक्षण विभागाने यासंदर्भात नवा शासन निर्णय (जीआर) मंगळवारी जारी केला.






हा आदेश राज्यातील सर्व शासकीय, खासगी, आणि विविध बोर्डांच्या (CBSE, ICSE, आंतरराष्ट्रीय) शाळांना लागू राहील.

'जय जय महाराष्ट्र माझा' हे गीत कवी राजा निळकंठ बढे यांनी लिहिले असून, संगीतकार श्रीनिवास खळे यांनी ते संगीतबद्ध केले आहे. १ फेब्रुवारी २०२३ रोजी हे गीत राज्य गीत म्हणून अधिकृतपणे घोषित करण्यात आले होते.

रोजच्या परिपाठात राष्ट्रगीतानंतर या गीताच्या पहिल्या दोन ओळी (१०१ सेकंद) गायल्या जातील, अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री दादासाहेब भुसे यांनी दिली. "या निर्णयामागे विद्यार्थ्यांमध्ये महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाबद्दल अभिमान आणि जागरूकता निर्माण करण्याचा उद्देश आहे," असेही ते म्हणाले. अंमलबजावणी पुढील शैक्षणिक सत्रापासून हा शासन निर्णय १४ जानेवारी २०२५ रोजी घोषित झाला असून, त्याची अंमलबजावणी येत्या शैक्षणिक सत्रापासून केली जाणार आहे. "या निर्णयामुळे शाळांमध्ये मराठी भाषा आणि राज्यगीताचा प्रभाव वाढेल," असा विश्वास भुसे यांनी व्यक्त केला. त्यांनी याला "महाराष्ट्राच्या अस्मितेचा सन्मान" असे संबोधले.

### स्वागत, पण प्रश्नही

या निर्णयाचे स्वागत करण्यात येत असले तरी, काही शिक्षणतज्ज्ञांनी शाळेच्या वेळापत्रकावर होणाऱ्या परिणामांवर प्रश्न उपस्थित केले आहेत. तर काहींनी यामागे राजकीय उद्देश असल्याचा दावाही केला आहे. मात्र सरकारने हा निर्णय सांस्कृतिक उपक्रम असल्याचे ठामपणे स्पष्ट केले आहे.

आता या निर्णयाची अंमलबजावणी शाळांमध्ये कशी होते आणि विद्यार्थी व शिक्षक त्याला कसा प्रतिसाद देतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## आदिवासी, जंगल, जनावर वाचायला हवे

### -डॉ. प्रकाश आमटे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथः आदिवासी भूकबळीचा शिकार होता कामा नये म्हणून आदिवासी भागात जंगल, जनावर आणि आदिवासी यांना संरक्षण आवश्यक आहे. त्यासाठी सर्वांचा सहभाग महत्वाचा आहे, असे आवाहन पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे यांनी अंबरनाथमध्ये केले. अंबरनाव पूर्व येथे महालक्ष्मीनगरात डॉ. मानकर यांचे शिवशाही हॉस्पिटलचे उद्घाटन प्रकाश आमटे यांच्या हस्ते पार पडले. या प्रसंगी आमटे म्हणाले की, आम्ही चंद्रपूर सारख्या आदिवासी विभागात निरपेक्ष भावनेने कुष्ठरोगी आणि आदिवासी यांची सेवा करत आहोत. या वेळी अंबरनाथचे प्रसिद्ध डॉक्टर एस व्ही देशपांडे, डॉ. गणेश राठोड (कोचिड योद्धा), डॉ मुंदडा सर, डॉ नरेंद्र शेट्टी (त्वचा रोग तज्ञ) डॉ विजय पिल्ले (हृदयरोग तज्ञ) डी हरीश लॅपसिया (बालरोग तज्ञ) यांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डॉ अविनाश गव्हाणे (स्त्री रोग तज्ञ यतीन भिसे (नेत्ररोग तज्ञ) चंद्रकांत साळवे (बालरोग तज्ञ ) डॉ सुजाता मानकामे, डी उषा माहेश्वरी, डॉ प्रमोद बेलापुरे, डॉ संदीप साठे, डॉ राहुल चौधरी, डॉ प्रतीक्षा गायकवाड आदींना डॉ प्रकाश आमटे, डॉ मंदाकिनी आमटे यांच्या हस्ते सन्मानित केले. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



# विनाअनुदानित व अंशतः अनुदानित तुकड्यांवरील सर्व शालेय कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव मागवा

## - शिक्षण क्रांती संघटनेची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : दि.१ नोव्हेंबर २००५ पुर्वी विनाअनुदानित व अंशतः अनुदानित तुकड्यांवरील शिक्षक शिक्षकेतरांचे प्रस्ताव १३ एप्रिल पर्यंत शिक्षणाधिकारी व शिक्षण उपसंचालक यांचेकडे पाठवून संबंधित कर्मचारी जुन्या पेंशनसाठी अमोलपात्र आहेत किंवा नाहीत याची पडताळणी ३० सप्टेंबर पर्यंत करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. याविषयाच्या एकूण ४८ याचिका एकत्रित करून दि.२७ फेब्रुवारी रोजी याबाबतचा अंतिम निर्णय घेण्यात आला आहे.

विविध संघटनांनी व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी वैयक्तिकरित्या याचिकांद्वारे जुन्या पेंशनची मागणी न्यायालयामार्फत शासनाकडे केली होती. १०० टक्के अनुदानित शाळेतील ज्या तुकड्या १ नोव्हेंबर २००५ पुर्वी विनाअनुदानित किंवा अंशतः अनुदानित तत्त्वावर सुरू होत्या त्या तुकड्यांवरील कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव माध्यमिक व प्राथमिक विभागाचे संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांकडे व उच्च माध्यमिकचे विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्याकडे ४५ दिवसांच्या आत पाठविण्याबाबत मुंबई उच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत. संबंधित अधिकाऱ्यांनी याबाबत पडताळणी करून ३० सप्टेंबर पर्यंत पात्र अपात्र यादी जाहीर करावयाची आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे १ नोव्हेंबर २००५ पुर्वी सेवेत आलेल्या शालेय कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू होण्यास आशेचा किरण दिसू लागला आहे. हा आदेश न्यायालयाच्या आदेशातील मुद्दा क्र १७ (ग) नुसार जे कर्मचारी न्यायालयात याचिका दाखल करू शकले नाहीत त्यांनाही लागू करण्यात आला असल्याने शासनाने तसे परिपत्रक निर्गमित करून १ नोव्हेंबर २००५ पुर्वी विनाअनुदानावर व अंशतः अनुदानावर असलेल्या कर्मचाऱ्यांचेही प्रस्ताव मागवावेत व न्यायालयाच्या आदेशाचे पालन करावे याबाबतचे निवेदन शिक्षण क्रांती संघटनेचे राज्य अध्यक्ष सुधीर देवराम घागस, पदाधिकारी रमेश निवृत्ती जाधव, ज्ञानेश्वर गोसावी, राजेंद्र गवळी, दुर्जन भोईर, शेखर जगताप व किशोर राठोड यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शालेय शिक्षणमंत्री व प्रधान सचिवांकडे केली आहे.

**मा.न्यायालयाच्या आदेशानुसार ज्या शाळा १०० टक्के अनुदानावर होत्या त्या शाळांमधील विनाअनुदानित किंवा अंशतः अनुदानित तुकड्यांवर १ नोव्हेंबर २००५ पुर्वी सेवेत आलेल्या शिक्षक शिक्षकेतरांचेच प्रस्ताव पडताळणीसाठी मागविले आहेत. परंतु शासनाने १ नोव्हेंबर २००५ पुर्वी सेवेत आलेल्या विनाअनुदानित व अंशतः अनुदानित तुकड्यांवरील सर्वच शिक्षक शिक्षकेरांचे प्रस्ताव पडताळणीसाठी मागवून पात्र उमेदवारांना जुन्या पेंशनचा लाभ द्यावी अशी मागणी शासनाकडे केली आहे.**

**-सुधीर देवराम घागस, राज्य अध्यक्ष, शिक्षण क्रांती संघटना**

# उचेडे येथे हनुमान मंदिराचे जिर्णोध्दार

## 'विविध धार्मिक कार्यक्रमांचा आयोजन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण तालुक्यातील उचेडे येथील हनुमान मंदिराचे जीर्णोद्धार करण्यात आले असून मंदिरात नव्या हनुमान मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात येणार आहे, यानिमिताने चार दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन ग्रामस्थांच्या करण्यात आले आहेत मूर्तीची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली.

८ एप्रिल पासून सलग चार दिवस सुरू होणाऱ्या हनुमान जन्मोत्सवाच्या कार्यक्रमात सायंकाळी सहा ते सात वाजता पंचक्रोशी यांचे हरिपाठ, रात्री ९.३० वा अंबिका भजन मंडळ यांचे संगीत भजन, बुधवार दि. ९ रोजी धान्य निवास व मूर्ती निद्रा निवास सोहळ्यानिमित्त सायंकाळी सहा ते सात वाजता हरिपाठ रात्री साडेनऊ वाजता दत्त प्रासादिक भजन मंडळ - बेणेघाट यांचे भजन, तसेच गुरुवार दिनांक 10 एप्रिल रोजी सकाळी साडेसात ते एप्रिल हनुमान मूर्तीची स्थापना कलश स्थापना ध्वजारोहण होणार आहे त्यानंतर सत्कार समारंभ, सायंकाळी ३ते ४.३० वा. महिलांचा हळदीकुंकु समारंभ, सायंकाळी सहा ते सात वाजता सावरसई (हेटवणे) यांचे हरिपाठ, रात्री ९.वा. हभप. गणपत महाराज हिलम यांचे किर्तन, तसेच दि. १२ एप्रिल रोजी हनुमान जयंतीनिमित्ताने हभप. केशव महाराज - कांदळे यांचे किर्तन होणार आहे तसेच मळेघर येथेही हनुमान मूर्ती प्राण प्रतिष्ठापना प्रथम वर्धापन दिन नुकताच साजरा केला, त्यावेळी विविध कार्यक्रम ग्रामस्थांच्या वतीने आयोजित करण्यात आले होते.

# राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे येथील श्री मावळी मंडळ संस्थेच्या शताब्दी वर्षानिमित्त व १०० व्या शिवजयंती उत्सवानिमित्त ७२ वी राज्यस्तरीय पुरुष व महिला गटाच्या कबड्डी स्पर्धेचे शुक्रवार दिनांक २५ एप्रिल २०२५ ते मंगळवार दिनांक २९ एप्रिल २०२५ रोजी आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत पुरुष गटात विजेत्या संघाला ₹ १,००,०००/- , उपविजेत्या संघाला ₹ ७५,०००/- व उपांत्य फेरीतील पराभूत संघाला ₹ २५,०००/- रोख रक्कम व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच महिला गटात विजेत्या संघाला ₹ ५५,०००/- , उपविजेत्या संघाला ₹ ४४,०००/- व उपांत्य फेरीतील पराभूत संघाला ₹ २२,०००/- रोख रक्कम व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच पुरुष गटात व महिला गटात उत्कृष्ट खेळाडूस ₹ १०,०००/- , उत्कृष्ट चढाईपटू खेळाडूस ₹ ५,०००/- व उत्कृष्ट पक्कड करणाऱ्या खेळाडूस ₹ ५,०००/- रोख रक्कम देऊन गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेतील प्रत्येक दिवसाच्या उत्कृष्ट खेळाडूस ₹ २,०००/- रोख रक्कम देऊन गौरविण्यात येणार आहे. या स्पर्धेत एकूण रू. ५,००,०००/- ची पारितोषिके ठेवण्यात आली आहेत.

स्पर्धेचे प्रवेश अर्ज श्री मावळी मंडळ कार्यालय (ठाणे) व महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या maharashtrakabaddi.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी स्पर्धकांनी शुक्रवार दिनांक १८ एप्रिल २०२५ रोजी पर्यंत अर्ज सादर करावे असे आवाहन प्रमुख कार्यवाह दिनेश मोरे यांनी केले आहेत.

# स्वातंत्र्य सेनानी स्मारकाचे नूतनीकरण करा

## 'माझं पेण' संघटनेतर्फे निवेदन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : आपल्याला स्वातंत्र्य मिळून कित्येक दशके उलटली, त्यांचे योगदान मोठे होते. त्यांचे ऋण फेडणे आपले कर्तव्य आहे. प्रशासनाने त्यांचा सन्मान ठेवण्याकरिता ही पवित्र वास्तू प्रत्येक ठिकाणी उभारली आहे. अशेच स्मारक आपल्या पेण शहरातील महात्मा गांधी वाचनालय, आणि डॉ.बाबा साहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या समोर आहे. त्याचे पवित्र राखणे प्रशासन, आणि नागरिकांचे कर्तव्य आहे. मात्र आत्ताच्या घडीला येथील परिसर फेरीवाले, खाजगी खाऊची दुकाने, राजकीय पक्ष संघटना, संस्था, विविध जाहिराती. वाढदिवसाचे शुभचिंतन यांचे बॅनर लाऊन पूर्ण विद्रुपीकरण झाले आहे. मात्र नगरपरिषदे मार्फत कठोर कारवाई का केली जात नाही हे न समजणारे कोडे आहे.

तरी या संपूर्ण वास्तूचे नूतनीकरण करून ताम्रपट धारक शासन नोंदणीकृत, दिग्गज सेनानीची नावे दिसून येत नाही. ती नावे स्थापित करण्यात यावी. त्याचबरोबर अनधिकृत फेरीवाले, विक्रेते, विविध विषयासंदर्भातील बॅनर बाजीला मज्जाव करणे, नो पार्किंग झोन, जाहीर करणे, अतिक्रण विरोधी पथकाकडून योग्य ती कारवाई करून हा परिसर स्वच्छ, आणि मनमोहन ठेऊन पवित्र राखावे यासाठी आज९ एप्रिल रोजी पोलिस प्रशासन तहसीलदार पेण नगरपरिषद यांना माझ पेण या सामाजिक संघटनेतर्फे निवेदन देण्यात आले यावेळी राजेंद्र पाटील, गणेश तांडेल, सूरज, आप्पा सत्वे अभिमन्यू म्हात्रे सी.आर म्हात्रे .सुधाकर पिंगळे गणेश कोळी आर .एन पाटील आदी उपस्थित होते.

सर्व पत्रकार बंधू, सामाजिक संस्था, संघटना, प्रसार माध्यमे, व्यक्तिगत प्रयत्न करण्यात आले मात्र नगरपरिषदे मार्फत पाहिजे तेवढे पर्यंत झाले नाहीत. म्हणून नवीन ऊर्जा देण्यासाठी आज निवेदन दिले गेले. तहसील मधील नोंदी नुसार सुमारे २५ स्वातंत्र्य सेनानीची नावे स्थापित होणे बाकी आहे. ती नावे स्थापित झाल्यावर खरेखुरे ऋण फेडले जाईल असे वाटते. अशी प्रतिक्रिया यावेळी देण्यात आली.

# मुरबाड मध्ये शिवसेनेची सदस्य नोंदणी सुरु



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : शिवसेना मुख्यनेते राज्याचे माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर सदस्य नोंदणी मोहिमेस सुरुवात करण्यात आली आहे, त्यानुसार आज मुरबाड तालुक्यातील शिवसेना पक्षाच्या सदस्य नोंदणी मोहिमेचा शुभारंभ शिवसेना नेते प्रकाश पाटील यांच्या हस्ते शिवसेना मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालय मुरबाड येथे करण्यात आला, शिवसेना तळागाळातील लोकांनसाठी काम करणारा पक्ष आहे, त्यामुळे गाव तिथे शाखा, घर तेथे शिवसैनिक ही संकल्पना आपल्याला राबवायची आहे, घराघरात शिवसैनिक असावा याकरिता शिवसेना सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात येत आहे त्या नुसार मुरबाड तालुक्यातुन भरघोस सभासद नोंदणी करा असे प्रकाश पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात केले.

या कार्यक्रमप्रसंगी शिवसेना नेते प्रकाश पाटील यांच्या समवेत उपनेते रुपेश म्हात्रे, तालुका प्रमुख कांतीलाल कंटे, ठाणे उपजिल्हाप्रमुख संजय भानुशाली, तालुका समन्वयक आप्पा यशवंतराव, संपर्क प्रमुख कल्पेश धुमाळ, महिला आघाडी प्रमुख देवयानी दळवी, तालुका सचिव महेश भांगे, संपर्क संघटक हेमंत लोकेश, शिवाजी वारघडे, संपत दळवी, एकनाथ व्यापारी, दत्ता शिंगोळे, नगरसेवक गटनेते नितीन तेलवणे, नगरसेविका नम्रता तेलवणे, तानाजी बिराडे, बाळकृष्ण म्हाडसे, अक्षय रोठे, कचरू म्हारसे, अशोक केदार, अजित शेख, विशाल देशमुख, पूजा आनंदे, किशोर अधिकारी, अंकुश कंटे, अमर देसले, दिनेश नंदकर, मेहुल राखाडे, यांसह मोठ्या संख्येने तालुका व शहरातील शिवसैनिक व महिला पदाधिकारी उपस्थित होते.

## ग्रामस्थांच्या समस्यांचा वाचणार पाढा

# जिल्हा परिषदेचे अधिकारी पंचायत समितींना देणार भेटी

## ब्लॉक फॅसिलिटेशन कमिटी मार्फत ग्रामस्थांच्या अडचणी सोडवण्यासाठी जिल्हा परिषद सज्ज

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी/अडचणी यांची तत्परतेने शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून लोकशाही दिन शासन स्तरावर राबविण्यात येत असतो त्याच धर्तीवर शासनाकडील मार्गदर्शक तत्वांनुसार जिल्हा परिषदेत १०० दिवसांचा कृती कार्यक्रम अंतर्गत पंचायत समिती स्तरावर तालुका सुविधा समिती योजना "Block Facilitation Committee" तयार करण्यात आली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली ब्लॉक फॅसिलिटेशन कमिटी पंचायत समितींना दि. ०९ एप्रिल, २०२५ रोजी, सकाळी १० वाजता भेटी देणार आहेत. यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्यामार्फत ग्रामस्थांनी या तालुका सुविधा समिती योजना कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले आहे. तालुकास्तर "तालुका सुविधा समिती योजना" (Block Facilitation Committee) कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे अथवा त्यांनी नेमलेले प्रतिनिधी पंचायत समिती भिवंडी, मुरबाड, शहापुर, अंबरनाथ, कल्याण येथे भेटी देणार आहेत. यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे पंचायत समिती भिवंडी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार पंचायत समिती मुरबाड, प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे पंचायत समिती शहापूर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) अविनाश फडतरे पंचायत समिती कल्याण, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे पंचायत समिती अंबरनाथ येथे ग्रामस्थांच्या तक्रारी, अडचणी निराकरण करण्यासाठी भेटी देणार आहेत.

तालुका सुविधा समिती Block Facilitation Committee प्रत्येक महिन्याचा दुसरा सोमवार या दिवशी सार्वजनिक सुट्टी असल्यास, त्यानंतर येणारा कामकाजाचा दिवस तालुका सुविधा समिती योजना कार्यक्रम" (Block Felicitation Committee) म्हणून ग्रामस्थांचे तक्रारी व अडचणी सोडविण्यासाठी अधिकारी पंचायत समितींना भेटी देणार आहेत, अशी माहिती उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र) अविनाश फडतरे यांनी दिली.

तालुका सुविधा समिती योजना कार्यक्रमात या विषयांचे अर्ज स्विकारले जातील.

१. तालुकांतर्गत विविध योजनांबाबत / पायाभूत सुविधांबाबत ग्रामस्थांच्या प्राप्त झालेल्या तक्रारी

२. जिल्हा परिषदे अंतर्गत कार्यरत कर्मचारी यांच्या लेखी तक्रारी बाबत.

३. ग्रामस्तरावर औद्योगिक गुंतवणुक करणाऱ्या उद्योजकांच्या अडचणी निराकरण करणेकरिता त्यांचेकडील प्राप्त निवेदने

४. व्यापारी व कामगार वर्गांच्या संघटनांशी चर्चा करुन त्यांच्या अडचणी सोडविणे

अर्ज स्विकृतीचे निकष

१. अर्ज विहित नमुन्यात असावा.

२. तक्रार निवेदन वैयक्तिक स्वरुपाची असावी

३. तालुका सुविधा समिती योजना दिनाकरीता अर्जदाराने अर्ज विहित नमुन्यात १५ दिवस अगोदर २ प्रतीत पाठविणे आवश्यक राहील.

कोणत्या विषयावरील अर्ज स्विकारले जाणार नाही

१. न्यायप्रविष्ठ प्रकरणं

२. अपील

३. सेवाविषयक, आस्थापना विषयक बाबी.

४. विहित नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज.

५. अंतिम उत्तर दिलेले आहे/देणार आहे अशा प्रकरणाची पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्ज.

६. तक्रार/निवेदन वैयक्तिक स्वरुपाची नसेल तर

७. वरील प्रमाणे आवश्यक कार्यवाहीसाठी ८ दिवसांत पाठविण्यात यावे व त्याची प्रत अर्जदारास पृष्ठांकीत करण्यात यावी.

८. कोणत्याही राजकीय पक्षाच्या, लोकप्रतीनिधीच्या, संस्थेच्या व कोणत्याही प्रकारच्या लेटर हेडवरील अर्ज स्विकारला जाणार नाही.

यावेळी तालुका स्तर तालुका सुविधा समिती योजना कार्यक्रमास गट विकास अधिकारी, पंचायत समिती हे या कार्यक्रमाचे सचिव व तालुकास्तरावरील विषयांशी निगडीत सबंधित तालुकास्तरावरील विभाग प्रमख उपस्थित राहणार आहेत.

अर्जदाराला अंतिम उत्तर तालुका सुविधा समिती योजना कार्यक्रमानंतर शक्य तितक्या लवकर एक महिन्याच्या आत देण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने मार्फत ग्रामस्थांनी या तालुका सुविधा समिती योजना कार्यक्रमात सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले आहे.

# वंचितांपर्यंत शिक्षणाची गंगा पोहचवा

## - प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या चाविन्द्रा येथील घनकचरा प्रक्रिया केंद्रानजीक डोंगरीपाडा येथील कचरा वेचक समुदायाच्या लोकवस्तीमध्ये नवजीवन लोकविकास संस्था या सामाजिक संस्थे मार्फत कचरावेचक मुलांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमांची आज महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक अनमोल सागर यांनी पाहणी केली. यावेळी कचरा वेचक मुलांसाठी दोन वयोगटात घेण्यात असलेले मुलभूत शिक्षण अध्ययन वर्ग, वाचनालय, कचरावेचक मुलांनी तयार केलेल्या कलावस्तु आदींची पाहणी करून आयुक्त यांनी या उपक्रमांचे कौतुक केले.

यावेळी अनौपचारिकपणे बोलताना त्यांनी सांगितले की, कचरा वेचकांसारख्या वंचित घटकांपर्यंत शिक्षणाची गंगा पोहविचणे हे त्यांच्या मुलांच्या भविष्यासाठी आत्यंतिक आवश्यक आहे. सदर मुलांची महानगरपालिकेच्या शाळांमध्ये पटनोंदणी केली असून अशा समाजोपयोगी उपक्रमांस महानगरपालिकेतर्फे आवश्यक ते पाठबळ उपलब्ध करून देण्यात येईल अशी ग्वाही देखील त्यांनी दिली.

यावेळी महानगरपालिका उपायुक्त (शिक्षण) बाळकृष्ण क्षीरसागर, सहायक आयुक्त (शिक्षण) डॉ.अनुराधा बाबर, प्रशासन अधिकारी नितीन पाटील, संस्थेच्या शिक्षणाधिकारी सौ.पूजा ठोकळे, समन्वयक उषा वाघमोडे आदी उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : महाराष्ट्रातील गुंतवणूकदार आणि व्यवसायांना एकत्र व्यासपीठ उपलब्ध करुन देणे, राज्याची अर्थव्यवस्था बळकट करण्याकरिता गुंतवणूक आकर्षित करणे, विकासाला चालना देणे, रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे या उद्देशाने स्थानिक पातळीवर शासनाच्या उद्योग विभागाशी संलग्नित विभागांच्या सहाय्याने "जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद-2025"चे आयोजन दि.11 एप्रिल 2025 रोजी सकाळी 9:30 वा.पासून जिल्हा नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग येथे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आली आहे. या जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेस जिल्ह्यातील उद्योजक, नवउद्योजक, गुंतवणूकदार यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी. एस. हरळय्या यांनी केले आहे.

या गुंतवणूक परिषदेस श्रीमती. व्ही.एम. शिरसाठ, उद्योग सह संचालक, कोकण विभाग, ठाणे, संतोष थिटे, विभागीय अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पनवेल, जी.एस. हरळय्या, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड-अलिबाग तसेच शासनाच्या उद्योग विभागाशी संलग्नित विभागाचे अधिकारी रायगड जिल्ह्यातील औद्योगिक संघटनाचे पदाधिकारी व प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

महाराष्ट्र राज्यातील उद्योग क्षेत्रातील गुंतवणूकीच्या संधी, राज्यातील उत्पादने यांची निर्यातवृध्दी तसेच औद्योगिक विकासाकरीता गतवर्षी फेब्रुवारी-मार्च 2024 दरम्यान जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदचे आयोजन करण्यात आले होते. जिल्ह्यांतील परिषदा मध्ये 2 हजार 652 सामंजस्य करारांवर स्वाक्ष-या होऊन रु. 96,680 कोटी रुपयांची गुंतवणूक प्रस्तावित असून त्यात 2,31,000 रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. विभागस्तरीय गुंतवणूक परिषद-2025 चे सहा विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी मार्च-2025 मध्ये आयोजन करण्यात आले होते.

जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेत रायगड जिल्ह्यातील प्रस्तावित गुंतवणूकदार यांच्या समवेत उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन सोबत सामंजस्य करार होणार आहे तसेच गुंतवणूक विषयक धोरणाचे सादरीकरण करण्यात येणार आहे.

मा.विकास आयुक्त (उद्योग) यांच्या निर्देशान्वये जिल्हास्तरावर स्थानिक पातळीवर शासनाच्या उद्योग विभागाशी संलग्नित विभागांच्या सहाय्याने जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेचे आयोजन करण्यात येत आहे.

# कल्याणमध्ये क्रिकेट लिग

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : रविवार दिनांक.१३ एप्रिल रोजी टर्फ महाराष्ट्र ढाबा जवळ, छत्री बंगला, चिकनघर कल्याण प. येथे आम्ही नगरकर प्रतिष्ठानच्या वतीने नगरकर प्रिमियर क्रिकेट लिग २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. क्रिकेटचा आनंद लुटाव, एकमेकांचा परिचय व्हावा या उद्देशाने हे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये आयपिएलची थिम देण्यात आली असून संघांना नावे त्याप्रमाणे दिली आहेत. खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी व खेळाचा आनंद लूटण्यासाठी उपस्थित रहावे असे आवाहन आम्ही नगरकर मुंबई संघचे मंगेश शेळके, बजरंग तांगडकर, शांताराम झावरे, प्रशांत आहेर, विरेंद्र जाधव, विक्की फापाळे, तानाजी करपे, हिरा आवारी, रामनाथ भोजने, अमोल वाकळे, नितिन भराट आदींनी केले आहे.



# भिवंडी मनपातर्फे अनधिकृतपणे नळ कनेक्शनवर कारवाई



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
भिवंडी : १) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिति क्र.२ अंतर्गत मौजे-नागाव . खान कंपाऊंड येथील तळ अधिक सात मजली इमारतीची कोणत्याही प्रकारची महानगरपालिकेची कर आकारणी न झालेल्या इमारतीकरिता महानगरपालिकेची रीतसर परवानगी न घेता अनधिकृतपणे महानगरपालिकेचा जल वाहिनीवरून घेण्यात आलेले एकूण १० नळ कनेक्शन महानगरपालिकेचा कर्मचाऱ्यामार्फत खंडित करून पाण्याचे पंप जप्त करण्यात आले. सदरची कारवाई मा. प्रशासक तथा आयुक्त सो यांचे आदेशान्वये मा. कार्यकारी अभियंता श्री संदीप पटणावर, पाणी पुरवठा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली, मा. उप अभियंता श्री उद्धव गावडे यांचे अधिपत्याखाली श्री विराज भोईर (पथक प्रमुख) यांचे मार्फत करण्यात आली

## फळपीक धारक शेतकऱ्यांना ई-पीक पाहणी बंधनकारक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
ठाणे : पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना दि.12 जून 2024 रोजीच्या शासन निर्णयान्वये कोकण विभागात भारतीय कृषी विमा कंपनी, बजाज अलायन्झ जनरल इन्शुरन्स कंपनी व युनिव्हरसल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनी या विमा कंपन्यांमार्फत मृग बहार सन 2024 मध्ये चिकू, फळपिकासाठी तर आंबिया बहार सन 2024-25 मध्ये काजू, केळी व आंबा या फळपिकांसाठी फळपिकांच्या हवामान धोक्यांच्या निकषानुसार राबविण्यात येत आहे.

पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेत सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी करणे बंधनकारक आहे. ज्या शेतकऱ्यांनी फळपिकांचा विमा घेतलेला आहे, परंतू फळपिकांची ई-पीक पाहणी डिजिटल क्रॉप सर्वे (DCS) मोबाईल ॲपद्वारे केलेली नाही त्यांनी दि.25 एप्रिल 2025 पर्यंत ई-पीक पाहणी पूर्ण करावी. अन्यथा दि.12 जून 2024 रोजीच्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार 7/12 उताऱ्यावर ई-पीक पाहणीची नोंद नसलेले सर्व विमा अर्ज रद्द करण्यात येतील व फळपीक विम्याचा लाभ दिला जाणार नाही.

याबाबतीत सविस्तर माहितीचा दि.12 जून 2024 चा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या https://www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

तरी फळपीक विमा योजनेचा लाभ मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी दि.25 एप्रिल 2025 पर्यंत डिजिटल क्रॉप सर्वे (DCS) मोबाईल ॲपद्वारे ई-पीक पाहणी पूर्ण करावी, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक बालाजी ताटे यांनी केले आहे.

# सोनारपाडा येथे होणार उड्डाणपुलाची उभारणी

## सार्वजनिक बांधकाम विभागाकडून १८ कोटी रुपयांचा निधी मंजूर

### खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नांना यश



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : डोंबिवली शहरातील वाहतूक व्यवस्थेला अधिक गती देण्यासाठी कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या पुढाकारातून शहरात विविध ठिकाणी रस्ते, उड्डाणपूल यांचे बांधकाम पूर्णत्वास गेले आहे. याच पार्श्वभूमीवर आता डोंबिवली शहरातील सागाव - मानपाडा रस्त्यावरील अत्यंत वर्दळीचे आणि सतत वाहनांनी गजबजलेल्या सोनारपाडा जंक्शन येथे उड्डाणपूल बांधण्यात येणार आहे. यामुळे या जंक्शन भागातील वाहतुकीला अधिक गती मिळणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून या पुलाच्या उभारणीसाठी १८ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्यासह भाजपा आमदार रवींद्र चव्हाण आणि शिवसेनेचे कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे हे देखील यासाठी सातत्याने आग्रही होते.कल्याण - डोंबिवली शहरात खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या पुढाकाराने अनेक विकासकामे मार्गी लागली आहेत. यामध्ये प्रामुख्याने शहरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी अनेक महत्वाकांक्षी प्रकल्प खासदार डॉ.शिंदे यांनी त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याने मार्गी लावले आहे. कल्याण रिंग रोड, मोठागाव उड्डाणपूल, शहरांतर्गत ९० फुटी रस्त्यांचे बांधकाम, रस्त्यांचे काँक्रीटीकरण, डोंबिवली एमआयडीसी आणि निवासी भागात रस्त्यांची उभारणी यांसह विविध रस्त्यांची कामे खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांनी पूर्णत्वास नेली आहेत. यासाठी राज्यसरकारकडे सातत्याने पत्रव्यवहार करणे, बैठका घेणे या माध्यमातून डॉ.शिंदे प्रयत्नशील होते.

डोंबिवली शहरात मोठ्या प्रमाणात गृहसंकुले उभी राहत आहे. यामुळे ओघाने वाहनांची संख्या देखील वाढत आहे. या वाढत्या वाहनसंख्येमुळे नागरिकांना वाहतूक कोंडीत अडकून पडावे लागू नये यासाठी शहरांतर्गत विविध ठिकाणी नव्या रस्त्यांची आणि उड्डाणपुलांची उभारणी करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर आता डोंबिवली शहरातील सागाव - मानपाडा रस्त्यावरील अत्यंत वर्दळीचे आणि सतत वाहनांनी गजबजलेल्या सोनारपाडा जंक्शन येथे उड्डाणपूल बांधण्यात येणार आहे. यामुळे या जंक्शन भागातील वाहतुकीला अधिक गती मिळणार आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून या पुलाच्या उभारणीसाठी १८ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे याबाबत खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यासाठी मागणी केली होती. तर भाजपा आमदार रवींद्र चव्हाण आणि शिवसेना आमदार राजेश मोरे हे देखील या उड्डाणपुलाच्या उभारणीसाठी आग्रही होते. त्यांच्या या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देऊन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून या उड्डाणपुलाच्या उभारणीसाठी १८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून लवकरच या पुलाचे काम सुरू करण्यात येणार आहे.

## वाचक मनोगत

### घरच शासकीय देखरेखीत बांधून द्यावे !

घरकुल लाभार्थ्यांसाठी पाच ब्रास मोफत वाळू उपलब्ध करून देण्यात निर्णय शासनाने घेतलाय खरा, निर्णय स्तुत्य आहे याबद्दल वाद नाही परंतु एवढ्या तुटपुंज्या वाळूत घर तयार होईल का हा खरा प्रश्न आहे. शिवाय चढत्या महागाईत, घर साहित्याचे वाढते दर, बांधकाम कारागीर, मजुरांची मजूरी हे सार पहाता आवास योजनेतून मिळणार मंजूर अनुदान इतके अल्प ठरते की कितीही ओढून ताणून घर बसविण्याचा प्रयत्न केला तरी अपु-या अनुदानामुळे लाभार्थ्यांचे घराचे काम कांहीतरी अपूर्ण राहते, सहाजिकच त्या गरीबाला घर पूर्ण न झाल्याचा मनस्ताप तर होतोच, त्याची केविलवाणी परिस्थिती होते आणि आनंदा ऐवजी विवंचना मात्र सतावत रहाते. म्हणूनच एक तर लाभार्थ्यांना योजने अंतर्गत शासनस्तरावर परिपूर्ण घरचं तयार करून त्यांच्या स्वाधीन केल्यास लाभधारकास विवंचना, चिंता, काळजी रहाणार नाही अथवा आजच्या महागाई नुसार, घरसाहित्याचा बाजार भाव विचारात घेऊन निदान अनुदानात वाढ करण्यात आल्यास ते त्याला सुसह्य होईल. परिपूर्ण झालेल्या घराचे समाधान, आनंद मिळेल अशी अपेक्षा.

\- विश्वनाथ पंडित ठाणे

# अंबरनाथ पंचायत समिती येथे रक्तदान शिबीर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
ठाणे : मुख्यमंत्री १०० दिवस कृती कार्यक्रमांतर्गत ठाणे जिल्हा परीषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी नाविन्यपुर्ण उपक्रम राबविण्याबाबत दिलेल्या मार्गदर्शनाने गटविकास अधिकारी, पंडीत राठोड यांच्या संकल्पनेतुन अंबरनाथ पंचायत समिती अंतर्गत सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी आयोजित केलेल्या आरोग्य तपासणी व रक्तदान शिबीरास उत्सुर्फूत प्रतिसाद मिळाला.

सेन्ट्रल हॉस्पीटल उल्हासनगरचे सिव्हील सर्जन डॉ.बनसोडे, यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.विलास वाघमारे, डॉ.हरीश बागडे, कमल शिंदे व त्याच्या टिमने अतिशय मेहनतीने हा कॅम्प यशस्वी केला.

अंबरनाथ पंचायत समितीच्या तालुका आरोग्य अधिकारी डॉ.मोहीते आणि त्यांच्या टिमने आरोग्य तपासणीचे काम अतिशय यशस्वीपणे पार पाडले. सुमारे 250 अधिकारी व कर्मवारी यांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला. यामध्ये शुगर, बी.पी., H.B. इत्यादींची चिकित्सा करण्यात आली.

या शिबीरात एकुण 49 अधिकारी व कर्मचारी रक्तदात्यांनी रक्तदान करुन आपले राष्ट्रीय कर्तव्य बजावले. यामध्ये तालुक्यातील पंचायत समिती अंतर्गत कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी महत्वाची भूमिका बजावली. सर्व रक्तदात्यांना प्रमाणपत्र देवुन सन्मानित करण्यात आले.

रक्तदान कार्यक्रमासाठी गटशिक्षणाधिकारी डॉ.विशाल पोतेकर, उपअभियंता बांधकाम पोतदार, एकात्मिक बालविकास अधिकारी योगेश यंदे, विस्तार अधिकारी सांख्यिकी प्रदीप मोहेकर, विस्तार अधिकारी ग्रामपंचायत आर.बी.महाले, पशुधन विकास अधिकारी डॉ.शितल कारगिरवार यांनी विषेश प्रयत्न केले आहेत.

# अनुदान व बीज भांडवल योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
रायगड : महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाकडून राज्य शासनाच्या अनुदान व बीज भांडवल योजना राबविण्यात येत असून या योजनांचा अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापक एस.आर.म्हसकर यांनी केले आहे.

महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या राज्य शासनाच्या योजना पुढीलप्रमाणे आहेत. 50 टक्के अनुदान योजना-प्रकल्प मर्यादा- रु.50,000/- पर्यंत प्रकल्प मर्यादेच्या 50 टक्के किंवा जास्तीतजास्त 25,000/- पर्यंत अनुदान देण्यात येते व उर्वरित बँकेमार्फत देण्यात येते. बँक कर्जावर बँकेच्या नियमाप्रमाणे व्याज आकारण्यात येते. कर्जाची परतफेड सर्वसाधारणपणे 3 वर्षात करावयाची आहे.

बीजभांडवल योजना- प्रकल्प मर्यादा- रु.50,001 ते 5 लाख पर्यंत प्रकल्प मर्यादेच्या 20 टक्के बीज भांडवल कर्ज महामंडळामार्फत 4 टक्के द.सा.द.शे. व्याज दराने देण्यात येते. या राशीमध्ये महामंडळाचे अनुदानाचा रु. 50,000/- समावेश आहे. बँकेचे कर्ज 75 टक्के देण्यात येते व सदर कर्जावर बँकेच्या नियमाप्रमाणे व्याजदर आकारण्यात येतो. महामंडळाचे व बँकेच्या कर्जाची परतफेड एकाच वेळेस ठरवून दिलेल्या समान मासिक हप्त्यानुसार 3 ते 5 वर्षाचे आत करावी लागते. अर्जदारास 5 टक्के स्वत:चा सहभाग भरावयाचा आहे.

अर्ज करण्यास आवश्यक पात्रता- अर्जदार अनुसूचित जाती/ नवबौध्द संवर्गातील असावा व त्याचे वय 18 वर्षापेक्षा जास्त असावे. राज्य महामंडळाच्या योजनेकरीता वार्षिक उत्पन्न मर्यादा शहरी व ग्रामीण भागाकरीता रुपये 3 लाख असावी. अर्जदार हा महामंडळाच्या कोणत्याही योजनांचा (राज्य/केंद्र) थकबाकीदार नसावा.

अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे- जातीचा व उत्पन्नाचा सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेला दाखला. पासपोर्ट आकाराचे फोटो, रेशनकार्ड, मतदार ओळखपत्र, रहिवाशी प्रमाणपत्र, आधारकार्ड व पॅनकार्ड, व्यवसायाचे कोटेशन, व्यवसायासाठी आवश्यक असल्यास जागेचा पुरावा, व्यवसायानुरुप इतर आवश्यक दाखले आवश्यकतेप्रमाणे प्रकल्प अहवाल, व्यवसायानुरुप आवश्यकते प्रमाणे इतर दाखले पत्र.उदा. वाहनाकरीता व व्यवसायाकरीता लायसन्स, परमिट, बॅजनंबर इ.जनधन योजनेचे खाते क्रमांक व पासबुकची झेरॉक्स

प्रशिक्षण योजना- अनुसूचित जातीच्या लाभधारकांना व्यवसायासाठी लागणारे तांत्रिक कौशल्य प्राप्त करण्यासाठी व संबंधित तांत्रिक व्यवसाय सुरु करण्याकरीता विविध व्यवसायिक ट्रेडचे शासनमान्य संस्थांमार्फत (3 ते 6महिन्यांपर्यंत) मोफत प्रशिक्षण देण्यात येते. प्रशिक्षण फी प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांना महामंडळामार्फत देण्यात येते. प्रशिक्षणार्थींना दरमहा रु.1,000/- विद्यावेतन देण्यात येते.

# ठाणे शहरात हुक्का पार्लरवर कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
ठाणे : ठाणे पोलीस दलाकडून हुक्का पार्लरच्या आड चालणाऱ्या बेकायदेशीर धंद्यांवर सातत्यपूर्ण कारवाई करण्यात येत आहे. ठाणे पोलीस दल गोपनीय छापे, गुन्हे दाखल करणे, परवाने तपासणे अशा अनेक स्तरांवर कारवाई करीत आहे. ठाणे शहरामध्ये जानेवारी 2025 ते अद्यापपर्यंत एकूण 3 बेकायदेशीर हुक्का पार्लरवर छापे टाकून संबधितांवर कोटपा कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

ठाणे शहरामध्ये तरूणांमध्ये प्रसिद्ध असलेल्या मॉल्स, कॅफे आणि हँग आऊट्स येथे विशेष गस्त व गुप्त तपासणी सुरू आहे. अशा ठिकाणी होणाऱ्या हालचालींवर लक्ष ठेवण्याचे निर्देश स्थानिक पोलीस ठाण्यांना देण्यात आले आहेत. ठाणे पोलीस दलाने अशा बेकायदेशीर प्रवृत्तींवर 'झिरो टोलरन्स' धोरण अवलंबिले आहे. पुढील काळातही अशा हुक्का पार्लरच्या आड सुरू असणाऱ्या बेकायदेशीर धंद्यांवर कारवाई करण्याची मोहिम अधिक गतीने राबविण्यात येत आहे, अशी माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी दिली आहे.

नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता

# भोंग्यांना विरोध : किरीट सोमय्यांना धमकी

## भाजप कार्यकर्त्यांकडून पोलिसांत तक्रार दाखल



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई: गोवंडीच्या शिवाजीनगर येथील भोंग्यांविरोधात आवाज उठविल्याप्रकरणी भाजप नेते आणि माजी खासदार किरीट सोमय्या यांना धमक्या देण्यात असल्याची खळबळजनक माहिती आहे. याचाबत भाजपच्या स्थानिक पदाधिकारी प्राणि कार्यकर्त्यांकडून पोलीस ठाण्यात तक्रारही दाखल करण्यात आली आहे. सोमय्या यांनी शिवाजीनगर येथील अनधिकृत मशीदीवरील भौंग्यांवर कारवाई करण्याची मागणी केली होती. त्यासंदर्भात त्यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्याला भेटून निवेदनसुद्धा दिले होते. ख्वाजा गरीब नवाज या संघटनेचा पदाधिकारी युसूफ अन्सारीने व्हिडिओ कॉलद्वारे सोमय्यांना धमकी दिल्याचा आरोप आहे. या व्हिडिओमध्ये धमकी देताना त्याने कोणीही मशिदीवरील भोंगे हटवू नये, तसेच आवाज कमी करण्याचा कडून फुले चि काहीही संबंध नसल्याचे महटले आहे. इतकेच नव्हे, तर सोमय्या यांना त्यांच्या घरी जाऊन भेटणार असून त्यांना जाब विचारणार असल्याचाही इशारा दिला आहे. याप्रकारानंतर भाजपच्या वतीने याबाबत कारवाई करण्यासाठी शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बापुराव देशमुख यांना निवेदन देण्यात आले आहे. लवकरात लवकर आरोपीला अटक करण्याची मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी ईशान्य मुंबईचे भाजपचे जिला उपाध्यक्ष लालबहादूर यादव, मंडळ अध्यक्ष डॉ. सतीश तिडके, ओबीसी सेल प्रदेश कार्यालय मंत्री हेमंत भास्कर, मंडल महामंत्री संदेश देठे, वॉर्ड अध्यक्ष राजेंद्र फणसगावकर, वॉर्ड अध्यक्ष प्रीतेश मिश्रा, किरण देवकते, रितू कोलते, शुभम जैस्वाल, सुनील गुप्ता, संजय साळवे, किशोर मोरे, दिनेश पाभारेकर, आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# नागरिकांच्या पायाभूत समस्या केंद्रबिंदु ठेवून कारभार करणार - केडीएमसीचे नवनियुक्त आयुक्त अभिनव गोयल




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : नागरिकांना केंद्रबिंदु ठेवून कारभार करणार असून शिक्षण, आरोग्यासह शहराच्या विकासाला प्राधान्य देणार असल्याचे सूतोवाच कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे नवनियुक्त आयुक्त अभिनव गोयल यांनी व्यक्त केला. कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, योगेश गोडसे, शहर अभियंता अनिता परदेशी, उपआयुक्त संजय जाधव आदी वरिष्ठ अधिकारीही उपस्थित होते.

याआधी धुळे आणि हिंगोली जिल्ह्यात जिल्हाधिकारी म्हणून आणि लातूर जिल्हा परिषदेमध्ये सीईओ म्हणून केलेल्या कामाचा आपल्याला अनुभव आहे. या तिन्ही ठिकाणपेक्षा कल्याण डोंबिवली ही शहरे सर्वाधिक नागरीकरण झालेली आहेत. या पार्श्वभूमीवर अगोदर आपल्याकडे काय काय समस्या आहेत, त्याचबरोबर काय काय पप्रकल्प सुरू आहेत त्यांना गती देण्याचा आपला प्रयत्न असेल. तर राज्याच्या मुख्यमंत्र्यानी प्रशासन लोकाभिमुख होण्याच्या दृष्टीने 100 दिवसांचा कार्यक्रम जाहीर केला आहे. यामध्ये नागरिककेंद्रीत प्रशासकीय कामकाजासाठी (सिटीजन सेंट्रिक ॲडमिनिस्ट्रेशन) आपला प्रयत्न राहणार असल्याचे सूतोवाच आयुक्त अभिनव गोयल यांनी केले.

नागरिकांच्या तक्रारी असो की त्यांना मिळणाऱ्या सेवा. त्या अधिकाधिक गतीने, पारदर्शकपणे त्यांना कशा देता येतील यासाठी काही सिस्टम्स डेव्हलप करायचे आहेत. आज टेक्नॉलॉजीचे प्रमाणही वाढलेले असल्याने एआयचाही वापर करण्याचा आपला प्रयत्न राहील असेही त्यांनी यावेळी सांगितले. तर आपण सिव्हिल इंजिनिअरिंगची पदवी घेतली असल्याने कल्याण डोंबिवलीतील पायाभूत सुविधा आणि इतर कामांवरही आपले विशेष लक्ष राहणार असल्याचे सांगत नविन आयुक्त गोयल यांनी आपल्या कारभाराची दिशा यावेळी स्पष्ट केली.

# शहापूर तालुका समस्यांनी ग्रस्त

## युवा कार्यकर्त्यांनी घेतली खा. सुरेश म्हात्रे यांची भेट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
शहापूर : शहापूर तालुका हा मुंबईचे प्रवेशद्वार समजला जात असून या ठिकाणाचे भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक व आर्थिक दृष्टीने महत्व आहे. परंतु तालुक्यातील डोळखांब, किन्हवली, कसारा, खर्डी, अघई, नडगाव, वासिंद, टाकीपठार या महत्वाच्या विभागांत आजही शेतकरी, युवा, कामगार, महिला यांच्याबाबतीत शेती, रोजगार, शिक्षण, आरोग्य यामध्ये सोई-सुविधांची प्रचंड वाणवा दिसून येते.त्या अनुषंगाने शहापुरच्या सर्वांगीण विकासाला चालना द्यावी अशी युवा कार्यकर्ते दयानंद पाटोळे यांनी ग्रामस्थासह खासदार सुरेश (बाळ्यांमामा ) म्हात्रे यांची भेट घेऊन मागाण्यांचे निवेदन दिले.दरम्यान येत्या काळात सदर समस्या मार्गी लावल्यास जनता व पर्यायाने तालुका खऱ्या अर्थाने सुजलाम सुफलाम झाल्याशिवाय राहणार नाही असे उपस्थित नागरिकांनी खा.म्हात्रे यांना सांगितले.

खराडे लघुपाटबंधाऱ्याचा डोळखांबकडे येणारा कालवा वर्षानुवर्षे बंद असल्याने त्याचा शासकीय स्तरावर पाठपुरावा करून डोळखांब,टेंभुर्ली गावालगतच्या गावांची पिण्याच्या पाण्याची समस्या सोडवून पूर्ण विभाग हरित पट्ट्याखाली आणावा, डोळखांब लघुपाटबंधारे धरणाला बऱ्याच वर्षापासून गळती लागली असून ओढ्यातून वाहून जाणारे पाणी पुढे असणारे धनदांडगे फॉर्म हाउस मालक वापरत आहेत.यामुळे साकुर्ली- बांधणपाडा गावांकडे जाणाऱ्या पाईप लाइनची दुरुस्ती करून हा कालवा पुढे गुंडे डेहणे ग्रामपंचायत हद्दीत नेऊन हे क्षेत्र हरीत पट्ट्याखाली यावे यासाठी उपायोजना करावी, तालुक्यातील टाकीपठार, साकडबाव, रानविहीर, कसारा, खर्डी,अघई अशा पट्ट्यातील कायमची पाणीटंचाई दूर करण्यासाठी शाश्वत उपाययोजा व्हावी, जलजीवन मिशन योजनेतून शहापूर तालुक्यात करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झालेला असून अधिकारी ठेकेदारांना पाठीशी घालून आवाज उठविणाऱ्या सामाजिक कार्यकर्ते यांना धमक्या देण्याचे काम प्रशासन करीत असल्याने तातडीने पत्रव्यवहार करून भ्रष्टाचाराशी संबंधित असलेल्यावर कारवाई व्हावी, शहापूर तालुक्यातील तरुणांसाठी रोजगार प्राप्त व्हावा यासाठी आयटी, उत्पादन क्षेत्रातील नामांकित कंपन्या खर्डी, वाशिंद, आसनगाव क्षेत्रात आणण्यासाठी प्रयत्न होऊन स्थानिक भूमिपुत्रांना ८० टक्के रोजगार देण्यासाठी प्रयत्न करावेत, तालुक्यात माफक दरात उच्च दर्जाचे शिक्षण प्राप्त व्हावे यासाठी शाळा, महाविद्यालये यांची संख्या वाढवून एमपीएससी,युपीएससी,नीट यांवर मार्गदर्शन करणाऱ्या मोफत प्रशिक्षण केंद्रांसोबतच प्रत्येक विभागात मोफत वाचनालये सुरू करणे,तालुक्यातील शहापूर सापगाव रस्त्यावर अनेक तरुणांचे बळी गेले असून वर्षानुवर्षे खराब रस्त्यावरून प्रवास करताना नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याने तातडीने प्रशासनाला आदेश देऊन रस्ता सुस्थितीत करणे, तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांवर कर्मचारी प्रत्यक्ष हजर रहात नसल्याने महिला,भगिनी, बालके यांना त्रास होत असल्याने प्रशासनाला आदेश देऊन यंत्रणा कार्यान्वित करणे,शहापूर सारख्या तालुक्याच्या ठिकाणी असलेले बसआगार मागील अंदाजे ८ ते ९ वर्षे रखडल्याने यावर संबंधित प्रशासनाला संपर्क करून प्रवाशांची समस्या मार्गी लावाव्यात अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## एमएमयू कार्यक्रमांतर्गत उत्तम कामगिरी करणारा जिल्हा म्हणून

# ठाणे जिल्ह्याचा आरोग्य मंत्र्यांच्या हस्ते सत्कार




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
ठाणे : जागतिक आरोग्य दिनानिमित्त दि. ०७ एप्रिल, २०२५ रोजी मोबाईल मेडिकल यूनिट (एमएमयू) कार्यक्रमांतर्गत उत्तम कामगिरी करणारा जिल्हा म्हणून आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर, नामदार राम शिंदे तसेच सचिव डॉ. निपुण विनायक व वीरेंद्र सिंग व आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान अमगोथू श्री रंगा नायक यांच्या हस्ते ठाणे जिल्ह्याला प्रथम पारितोषिक देऊन गुणगौरव करण्यात आला.

यावेळी सन्मान स्विकारताना जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. स्वाती शिंदे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. अमोल बाग तसेच मोबाईल मेडिकल यूनिटचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली निश्चित केलेल्या गावांना भेटी, तपासणी केलेल्या रुग्णांची संख्या, केलेल्या तपासण्या, असांसर्गिक आजारांसाठी स्क्रिनिंग, गरोदर मातांची तपासणी इत्यादी कामे उत्कृष्ट केल्याबद्दल सन्मानित करण्यात आले आहे. ठाणे जिल्ह्यात उत्तम कामगिरी केल्याबद्दल मोबाईल मेडिकल युनिटच्या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024